# हिंदी - राष्ट्रभाषा - राजभाषा-आंतरराष्ट्रीय भाषा

## राष्ट्रभाषा - हिंदी

कोणत्याही स्वतंत्र आणि सार्वभौम देशात त्याच्या राष्ट्रध्वजाचे, राष्ट्रगीताचे जे महत्व असते तेव्हढेच आणि तसेच महत्व राष्ट्रभाषेचे असते. गेल्या अनेक शतका पासून संस्कृत, पाली, प्राकृत नंतर संपूर्ण भारतात साहित्यिक आणि सांस्कृतिक अभिव्यक्तींचे सर्वसामान्य माध्यम म्हणून हिंदी भाषेचा वापर मोठया प्रमाणावर होत आहे. भारतातील अधिकांश जनतेची ती बोली भाषा आहे. विविध प्रांतातील अनेक संत कवींनी आपल्या काव्य रचना हिंदीतून करून अध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसाचे जतन केले आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्यें राष्ट्रीय ऐक्याच्या भूमिकेतून तत्कालीन नेत्यांनी राष्ट्रभाषा म्हणून याच भाषेचा स्वीकार केला आहे. या भाषेस तिच्या स्थानिक स्वरूपावरून, शैलीवरून किंवां सर्व समावेशक प्रवृत्तीमुळे संस्कृत, पाली, प्राकृत, अरबी, फारसी इत्यादी भाषा शब्द भांडारातून आत्मसात केलेल्या गुणांमुळे - हिंदुई, हिंदुस्थानी, दक्खिनी, उर्दू, खडी बोली, इत्यादी नांवाने ओळखले जाते. राष्ट्रीय एकात्मतेचे एक प्रभावी माध्यम या नात्याने या सर्व समावेशक अशा स्वरूपाच्या नांवा पैकी " हिंदी " या नावा संबंधीचा निर्णय भारतीय संसदेत जुलै - १९४७ मध्ये बहुमताने घेतला आहे.

<u>कोणत्याही भाषेस राष्ट्रभाषेचा दर्जा दयावयाचा असल्यास तिच्या मध्ये पुढील पाच गुण अवश्य असले पाहिजेत असे विचार महात्मा गांधींनी प्रकट केले होते.</u>

१. संपूर्ण भारतात धार्मिक, आर्थिक आणि राजनैनिक संपर्कासाठी माध्यम म्हणून प्रयोग करण्यांस ती सक्षम असली पाहिजे.

२. ती अधिकांश भारतीय जनते मध्ये बोलली जात असावी.

३. संपूर्ण देशामध्ये शिकण्यासाठी ती सोपी असावी.

४. सरकारी अधिका-यांना शिकण्यास ती सोपी असावी.

५. तात्पुरते आणि क्षणिक हित डोळ्या समोर ठेवून अशा भाषेची निवड करण्यांत येवू नये.

...२

महात्मा गांधी आणि तत्कालीन प्रमुख नेत्यांच्या मतांचा आणि हिंदीचे सर्व समावेशक–राष्ट्रीय एकात्मतेचे स्वरूप लक्षात घेऊन तसेच वर उल्लेखित सर्व गुण हिंदी भाषे मध्ये असल्यामुळे भारतीय संसदेच्या भाषा विषयक संविधान समितीने दिनांक १४ सप्टेंबर १९४९ रोजी भारतीय संघराज्याची राजभाषा देवनागरी लिपीतील हिंदी असेल असा निर्णय घेतला. म्हणूनच १४ सप्टेंबर हा " हिंदी राजभाषा दिवस " तसेच या दिवसापासून " हिंदी सप्ताह" " हिंदी पंधरवडा " – दरवर्षी आयोजित करण्यांत येत असतात. शेकडो वर्षापासून भारतीय मानस अंगी भिनलेल्या – हिंदीचे स्वरूप जन मानसाच्या भाषिक व्यवहारा बरोबर विकासशील राहणार हे स्वाभाविकच आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारता सारख्या विशाल बहुभाषिक लोकतांत्रिकराज्याच्या व्यवहाराची भाषा म्हणून– राजभाषा म्हणून – तिचा वापर निश्चित स्वरूपात होणे अपरिहार्यच ठरते. अनेक प्रकारे संपूर्ण देशात हिंदी चा वापर सर्वव्याप्त असा आहे. हिंदी प्रचाराच्या प्रारंभापासूनच " राष्ट्रभाषा " म्हणून ती प्रचलित आहे आणि सर्वमान्य ठरली आहे. असे असले तरी राष्ट्रभाषा म्हणून तिचा उल्लेख भारतीय राज्यघटनेत अद्याप झालेला नाही ही निश्चितच खटकणारी गोष्ट होय.

## राजभाषा हिंदी

अशा निश्चित स्वरूपाच्या राजभाषा हिंदी तसेच भारताच्या प्रत्येक प्रदेशाची संबंधित राज्यभाषा जी त्या प्रदेशाची राजभाषाच असते– इत्यांदीच्या वापरा संबंधी भारतीय संविधानाच्या ( राज्य घटनेच्या ) भाग १७ मध्ये चार प्रकरणांमधून स्पष्ट करण्यांत आले आहे.

पहिल्या प्रकरणांमध्ये संघ राज्याची राजभाषा देवनागरी लिपीतील हिंदी असेल हे नमूद केले आहे. संविधानाच्या प्रारंभापासून ( २६ जानेवारी १९५० ) पंधरा वर्षाच्या कालावधी पर्यन्त हिंदी बरोबर इंग्रजीचा शासकीय प्रयोजनासाठी वापर चालू राहील असे म्हटले असले ती पंधरा वर्षानंतर संवैधानिक तरतुदीनुसार संशोधन करून ही कालमर्यादा पंधरा वर्षानंतर आणि आता तर त्यापुढे अनिश्चित काळा पर्यन्त वाढलेली आहे. देशातील प्रांतीय राज्य शासनाकडून शासकीय प्रयोजनासाठी हिंदीचाच वापर व्हावा अशा प्रकारचे प्रस्ताव मंजूर होऊन संघ राज्याकडे गेल्यास " राजभाषा "

म्हणून केवळ हिंदीचाच वापर करण्याचा निर्णय संघराज्य घेऊ शकणार आहे. तो पावेतो हिंदीबरोबर इंग्रजीचाही राजभाषा म्हणून वापर होतं राहणार आहे. आजच्या इंग्रजी प्रभावाने भारावून गेलेल्या परिस्थिती मध्ये तो दिन केंव्हा उगवणार हे सांगण कठीणच ! स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ~~५९~~ अनेक वर्षे लोटली तरी इंग्रजीच्या कुबडी सह राजभाषा हिंदीची वाटचाल ही खरोखरच हिंदीच्या अपंगत्वाचे लक्षण आहे की वसाहतवादी इंग्रजी साम्राज्याच्या गुलामगिरीच्या मानसिकतचे अवशेष जपून ठेवण्याची प्रवृत्ती आहे याचा गांभीर्याने विचार होणे जरूरी आहे एवढे मात्र निश्चित !

राजभाषा व हिंदीचा वापर केंद्र सरकारच्या अर्थात संघ राज्याच्या सर्व प्रकारच्या प्रशासकीय प्रेयाजनाकरता तसेच केन्द्र आणि राज्य सरकार आणि राज्याच्या परस्पर प्रयोजनासाठी होतो.

संविधानाच्या या १७ व्या भागातील तिस–या प्रकरणामध्ये सर्वोच्च आणि उच्च न्यायालयामध्ये, अधिनियम, विधेयके इत्यादी करता वापरावयाची भाषा म्हणून प्राधिकृत पाठ इंग्रजीत असतील असे नमूद करण्यांत आले आहे. राज्य पातळीवर मात्र शासकीय प्रयोजना करता हिंदी भाषेचा अथवा प्रादेशिक भाषेचा वापर राज्यपाल यांना राष्ट्रपतींच्या पूर्वसंमतीने प्राधिकृत करता येतो.

१७ व्या भागातील चौथ्या प्रकरणात प्रत्येक व्यक्तीसाठी पुढीलप्रमाणे एक महत्वपूर्ण तरतूद करण्यांत आली आहे.

“ प्रत्येक व्यक्ती कोणत्याही गा–हाण्याच्या निवारणा करता संघ राज्याच्या किंवा राज्याच्या कोणत्याही अधिका–याकडे किंवा प्राधिकरणाकडे, प्रकरणपरत्वे, संघ राज्यात किंवा त्या राज्यात वापरल्या जाणा–यापैकी कोणत्याही भाषेत अभिवेदन सादर करण्याला हक्कदार असेल ” म्हणजेच हिंदी राजभाषे बरोबरच प्रादेशिक राज्यभाषांना या संदर्भात तेव्हढेच महत्व दिले गेले आहे. याच प्रकरणात पुढे प्राथमिक स्तरावर मातृभाषेतून शिक्षणाच्या सोयी, भाषिक अल्प संख्याक समाजाकरता विशेष अधिकारी आणि हिंदी भाषेच्या विकासासाठी निदेशक, आयोग आदिंचा उल्लेख आहे.

....४

भारतीय संविधानाच्या भाग १७ मधील अनुच्छेद ३४४ राजभाषेसाठी आयोग व संसदीय समिती घटित करण्या संबंधी असून यानुसार आठव्या अनुसूची मध्ये भारतीय प्राधिकृत प्रादेशिक भाषांची यादी दिलेली आहे. देशातील इतर प्राधिकृत प्रादेशिक भाषा- मराठी, आसामी, बंगाली, तेलगू , इत्यादीबरोबरच हिंदी भाषेचा पण उल्लेख आहे. अर्थात ही हिंदी प्रादेशिक भाषा हिंदी होय. उत्तर भारतातील अनेक राज्यातून या हिंदीचा वापर तिच्या शेकडो बोली-भाषांसह होत आहे.

देशातील सर्व प्रादेशिक भाषांच्या विकासा बरोबरच राजभाषा हिंदीचा विकास अभिप्रेत आहे. भाषांवर प्रांत रचनेचा हा एक महत्वाचा उद्‌देश आहे. यूनेस्कोच्या तज्ञाच्या मते “ शासकीय कामकाजा साठी ज्या भाषेचा स्वीकार केला गेला आहे तसेच शासन आणि जनता यांच्या मध्ये परस्पर संपर्काचे काम करणारी ती राजभाषा होय ” या परिभाषेप्रमाणे राजभाषा हिंदीचा व्यापक विकास आणि तिच्या वाढत्या कार्य-कक्षा लक्षात घेऊन अनेकविध योजना राबविण्यांत येतात. निश्चित अशी शब्दाबवली, प्रशासकीय साहित्य निर्मिती, हिंदी शिक्षण - प्रशिक्षण, मुद्रण क्षमता वाढविण्यासाठी आधुनिक यांत्रिक साधनांमध्ये ( तांत्रिक टाईपरायटर, टेलीप्रिंटर, संगणक इ. ) हिंदीचा वापर इत्यादींचा यात समावेश आहे.

## आंतरराष्ट्रीय स्तरावर हिंदी :

सार्वभौम, स्वतंद्ध, बलाढय् लोकशाही असलेल्या भारताची राष्ट्रभाषा आणि राजभाषा हिंदीचे आंतरराष्ट्रीय स्तरावर पण एक आगळे स्थान आहे. संयुक्त राष्ट्र संघामध्यें हिंदीला मान्यता प्राप्त व्हावी म्हणून नागपूरला झालेल्या प्रथम विश्व हिंदी सम्मेलनात सर्व सम्मतीने प्रस्ताव स्वीकृत झालेला आहे. अदयाप त्या दिशेने निश्चित असे प्रयत्न झालेले दिसत नाहीत. कधी तरी माननीय पंतप्रधानांनी संयुक्त राष्ट्रसंघा मध्यें हिंदीतून भाषण करणे ही निश्चितच गौरवपूर्ण घटना असली तरी या भाषेला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळवून देण्यासाठी निश्चत असे प्रयत्न होणे अगत्याचे ठरते. भारता बाहेर जवळपास शंभर विद्यापीठामध्यें हिंदीचे अध्ययन - अध्यापन होत आहे. यातील अनेक विद्यापीठात हिंदी-संशोधन कार्य होत असते. या दृष्टीने

एक समर्थ आणि समृध्द अशा भाषेच्या रूपात हिंदीला निश्चितच मान्यता मिळत आहे असे असले तरी संयुक्त राष्ट्रसंघ आणि तत्सम आंतरराष्ट्रीय संस्था मध्यें हिंदी भाषेस मान्यता मिळाल्यास अनुवाद कार्य, तुलनात्मक साहित्य, दुभाषिक, इत्यादी क्षेत्रात ती अधिक विकासशील होईल यात शंका नाही.

आताच नवीन शतकाचा प्रारंभ झाला - असून संगणक आणि नव-नवीन संचार माध्यमातून विश्वाला गवसणी घालू पाहणा-या औद्योगीक आणि व्यापारिक तत्वांची आव्हाने आंतरराष्ट्रीय स्तरावर हिंदी समोर आहेत. ही सर्व आव्हाने पेलण्यासाठी भाषेच्या संदर्भात भारतीय मानसिकता बदलण्याची नितांत आणि अपरिहार्य अशी गरज आहे. मातृभाषेतून शिक्षण ते आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची राष्ट्रभाषा आणि राजभाषेचे महत्व या सर्वच गोष्टी केवळ एका अस्मितापूर्ण भाषिक मानसिकेतेतूनच साध्य होणार आहेत. भारतच्या गौरवात अणूस्फोट जेव्हढी महत्वाची घटना ठरली आहे तेव्हढीच भारतीय आंतरिक एकात्म भावशक्तीची सशक्त भाषिक अभिव्यक्तीही गौरवशाली ठरणार आहे.

**********************

चंद्रकांत न्यायाधीश,
स्वागत १११, श्रेयनगर,
नवा उस्मानपुरा, औरंगाबाद- ४३१००५
फोन नं. २३५३७८१
९४०५१६८५५७